| वर्ष - 8 | अंक -89 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज(TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा रंग केशरी

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 06 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## साखरपट्ट्यातील आणखी एक दिग्गज नेता शरद पवारांच्या गळाला

# शरद पवारांचे धक्कातंत्र!

## प्रवेशाचा मुहूर्त लवकरच, अजितदादांना मोठा धक्का

। पुणे । महाईन्यूज

**ऐन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रातील बडे नेते रामराजे निंबाळकर आता अजित पवार यांची साथ सोडणार आहेत. ते ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या गटात ते लवकरच प्रवेश करणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रवेशाचा मुहूर्त लवकरच निश्चित होण्याची शक्यता असून यामुळे अजित पवार यांना पुन्हा एकदा धक्का बसणार आहे.**



### अजित पवारांची ताकद कमी होणार

पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यातील कागलमध्ये समरजीत घाटगे यांच्या पाठोपाठ इंदापुरात हर्षवर्धन पाटील यांनी प्रवेश केल्याने मोठा धक्का देण्यात आला. त्यानंतर माढ्यात बबनराव शिंदे, नगरमधील आमदार हे आता राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) वाटेवर असतानाच फलटणमधील निंबाळकर यांच्या प्रवेशामुळे अजित पवार यांची ताकद कमी होणार असल्याचे बोलले जात आहे. परिणामी महायुतीचे साखरपट्ट्यातील राजकीय भवितव्य काय असणार हे येत्या निवडणुकीतच पाहायला मिळणार आहे.

विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्यापूर्वीच ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडून विरोधकांना मोठे धक्कातंत्र देण्याचे काम सध्या सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच मोदी बागेतील त्यांच्या निवासस्थानी सोलापूर, नगर जिल्ह्यातील बडे नेते आमदारांनी शरद पवार यांची भेट घेऊन पक्ष प्रवेशाची चर्चा केल्याचे समजते. त्यामुळे महायुतीला मोठा धक्का देण्याची रणनिती पवार यांनी आखल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. भाजपचे मोठे नेते असलेले हर्षवर्धन पाटील हे भाजपमध्ये अस्वस्थ होते. पाटील यांनी शरद पवार यांच्याशी चर्चा करून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले. महायुतीला धक्का बसला असतानाच पवार यांनी आणखी दुसरा धक्का अजित पवार यांना देण्याची तयारी केल्याची चर्चा सुरु झाली आहे. यावरुन राजकीय वर्तुळातील हे प्रयोग निवडणुकीपर्यंत चालणार असल्याचे संकेत मिळतात. पुण्यात निसर्ग मंगल कार्यालयात शरद पवार यांनी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रासह विदर्भातील इच्छुकांच्या मुलाखती शनिवारपासून सुरू केल्या आहेत. पुढील दोन दिवस या मुलाखतींचे सत्र सुरू राहील.

---

## पुण्यातील महिला असुरक्षित! सात महिन्यांत ४५० विनयभंग

## अत्याचाराची चिंताजनक आकडेवारी समोर

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि शिक्षणाचे माहेरघर असा लौकिक असलेल्या पुण्यात या वर्षातील फेब्रुवारी ते ऑगस्ट या सात महिन्यांत २६५ बलात्काराचे आणि ४५० विनयभंगाचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. शाळकरी मुलींवर लैंगिक अत्याचार, वडिलांकडूनच अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग, एकतर्फी प्रेमातून चाकूने हल्ला, समाजमाध्यमात अश्लील मेसेज व छायाचित्रे पाठवून



विनयभंग.. असे अत्याचाराचे गुन्हे वारंवार घडत असल्याने महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

कोंढवा-लुल्लानगर परिसरातील नामांकित शाळेच्या सहा वर्षांच्या दोन विद्यार्थिनींवर स्कूल व्हॅन चालकाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना; तसेच बोपदेव घाट परिसरात मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी सामूहिक बलात्कार केल्याच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. आठवडाभरापूर्वी एका महाविद्यालयात विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे महिलांच्या दृष्टीने सुरक्षित मानल्या जाणाऱ्या पुण्यात लैंगिक अत्याचार व विनयभंगाच्या घटना वाढत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. महिला व मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी पुणे पोलिसांकडून दामिनी पथक, पोलिस काका, पोलिस दीदी आदी उपक्रम राबविले जात आहेत. तरीही दर महिन्याला बलात्काराच्या सरासरी ३८, तर विनयभंगाच्या ६५ गुन्ह्यांची पोलिसांकडे नोंद होत आहे. त्यामुळे

### अत्याचाराच्या 360 घटना

शहरात मागील नऊ महिन्यांत अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या ३६० घटना घडल्या असून, लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्याखाली (पोक्सो) गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कुटुंबीय-परिचितांसह अनोळखी नराधमांच्या अत्याचारामुळे या अल्पवयीनांच्या कोवळ्या मनाला कधीही भरून न येणाऱ्या जखमा होत आहेत.

### न्यायालयाची प्रतीक्षाच

पुणे जिल्ह्यात मुलामुलींवर अत्याचाराची पाच अल्पवयीन हजाराहून अधिक प्रकरणे न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामध्ये पुणे शहरातील साडेतीन हजारपेक्षा अधिक पीडितांची प्रकरणे प्रलंबित असून, ती तातडीने निकाली काढण्यासाठी एकही विशेष जलदगती न्यायालय नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शिवाजीनगर येथे पुणे न्यायालयाच्या आवारात पोक्सो कायद्यांतर्गत न्यायालयांची स्वतंत्र इमारत उभारण्यात येत असली, तरी त्याला एक ते दीड वर्षांचा कालावधी आहे. तोपर्यंत हे खटले तातडीने निकाली काढण्यासाठी विशेष जलदगती न्यायालय सुरू करण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

# बजरंग दलाकडून दांडिया कार्यक्रम बंद!

## पोलिसांनी कायद्याने कठोर कारवाई करावी : सुप्रिया सुळे

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशभरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गरबा, दांडियासाठी मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु, अशा कार्यक्रमांना काही संघटना विरोध करत असल्याचं पुढे येत आहे. आता पुण्यातील एक कार्यक्रम बजरंग दलाने बंद पाडण्याचा प्रयत्न केल्याचा दावा राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. याबाबत त्यांनी बजरंग दलाला इशारा दिला आहे.**



"बारामती येथील चिराग गार्डन येथे नवरात्रीच्या निमित्ताने सुरू असलेला दांडियाचा कार्यक्रम बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी बंद पाडण्याचा प्रयत्न केला. बारामतीत अशा पद्धतीने गुंडगिरी कधीच झाली नाही. हे 'मोरल पोलिसींग' यापूर्वीही आम्ही खपवून घेतले नव्हते आणि यापुढेही घेणार नाही. अशा प्रकारचे उद्योग करणाऱ्यांवर पोलिसांनी कायद्याने कठोर कारवाई करावी", असं आवाहन सुप्रिया सुळे यांनी केलं आहे.तसंच, नवरात्रोत्सवात दांडिया आणि गरबा खेळण्याच्या ठिकाणी महिलांच्या छेडछाडीचे प्रकार घडल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी पोलीस ठाणे, गुन्हे शाखेतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी पायी गस्त घालण्याचे आदेशही पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. नवरात्र उत्सवामध्ये दांडिया खेळण्याच्या ठिकाणी आणि आजूबाजूच्या परिसरात आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात यावा. हद्दीतील उद्याने, मोकळी मैदाने, सार्वजनिक गर्दीची ठिकाणे या जागी गस्त घालावी. गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरे फिरणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशाही सूचना पोलीस आयुक्त चौबे यांनी दिल्या.दरम्यान, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी देशभरातील विविध ठिकाणी असे कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न केला आहे. इंदूरमधील भवरकुवा परिसरात गेल्या ३५ वर्षांपासून नवरात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाचे आयोजक फिरोज खान यांच्यावर लव्ह जिहादचा प्रचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. "या कार्यक्रमाचा उपयोग हिंदू महिला आणि मुस्लीम पुरुषांमधील संबंध वाढवण्यासाठी केला जातो", असा आरोप स्थानिक बजरंग दलाने केला आहे. यासंदर्भात त्यांनी पोलिसांकडे तक्रारही केली आहे.बारामतीत अशा पद्धतीने गुंडगिरी कधीच झाली नाही. हे 'मोरल पोलिसींग' यापूर्वीही आम्ही खपवून घेतले नव्हते आणि यापुढेही घेणार नाही. अशा प्रकारचे उद्योग करणाऱ्यांवर पोलिसांनी कायद्याने कठोर कारवाई करावी", असं आवाहन सुप्रिया सुळे यांनी केलं आहे.तसंच, नवरात्रोत्सवात दांडिया आणि गरबा खेळण्याच्या ठिकाणी महिलांच्या छेडछाडीचे प्रकार घडल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी पोलीस ठाणे, गुन्हे शाखेतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी पायी गस्त घालण्याचे आदेशही पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. नवरात्र उत्सवामध्ये दांडिया खेळण्याच्या ठिकाणी आणि आजूबाजूच्या परिसरात आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात यावा. हद्दीतील उद्याने, मोकळी मैदाने, सार्वजनिक गर्दीची ठिकाणे या जागी गस्त घालावी.

### पोलिसांनी कठोर कारवाई करावी

याची दक्षता घ्यावी, अशाही सूचना पोलीस आयुक्त चौबे यांनी दिल्या.दरम्यान, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी देशभरातील विविध ठिकाणी असे कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न केला आहे. फिरोज खान यांच्यावर लव्ह जिहादचा प्रचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. देशभरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गरबा, दांडियासाठी मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु, अशा कार्यक्रमांना काही संघटना विरोध करत असल्याचं पुढे येत आहे. आता पुण्यातील एक कार्यक्रम बजरंग दलाने बंद पाडण्याचा प्रयत्न केल्याचा दावा राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.

---

# मावळच्या मायबाप जनतेला दहशतीखाली आणू नका

## "प्रत्येकजण मरायला आलाय", शेळकेंचा विरोधकांना इशारा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. पुढील काही दिवसांमध्ये निवडणूक जाहीर होणार आहे. त्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली.**

असून एकीकडे महायुती तर दुसरीकडे महाविकास आघाडीने राज्यभरात सभांचा धडाका लावला आहे. वेगवेगळ्या मतदारसंघात नेत्यांच्या सभा आणि मेळावे सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेतला आहे. यातच महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा प्रमुख सामना विधानसभेला होण्याची शक्यता आहे. सध्या सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.

अशातच एका-एका मतदारसंघामधून अनेक उमेदवार इच्छुक असल्याचंही पाहायला मिळत आहे. यावरूनच राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) आमदार सुनील शेळके यांनी इच्छुक उमेदवारांसह विरोधकांना सभेतून बोलताना इशारा दिला आहे. त्यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भर सभेत आमदार सुनील शेळके यांचे कान टोचले आहेत.





"जरा सबुरीनं घ्यायचं असतं. कोणाला नाराज करायचं नाही", असं म्हणत अजित पवारांनी सुनील शेळके यांचे कान टोचले."तुम्ही तुमची इच्छा व्यक्त करत असताना मावळच्या मायबाप जनतेला दहशतीखाली आणू नका.

मावळच्या मायबाप जनतेला दडपणाखाली आणण्याचा प्रयत्न तुम्ही कराल तर आज व्यासपीठावरून सांगतो, माझी मायबाप जनता प्रेमळ आहे. एखाद्याला जीव लावते आणि एखाद्याचा कार्यक्रम करते. कुणी दादागिरी करण्याचा प्रयत्न केला तर सुनील शेळके या मायबाप जनतेवरील अन्याय सहन करणार नाही. प्रत्येकजण मरायला आलेला आहे.

### अजित पवार काय म्हणाले?

जर तुम्हाला दहशत कारायची असेल आणि दादागिरी करायची असेल तर माझ्यावर करा. मात्र, मायबाप जनतेला आणि माझ्या सहकाऱ्यांवर दादागिरी करायची नाही", असं आमदार सुनील शेळके यांनी म्हटलं.दरम्यान, महायुतीचे उमेदवार अद्याप जाहीर झालेले नाहीत. त्यामुळे मतदारसंघात अनेकदा उमेदवारीवरून रस्सीखेच सुरु असल्याचं पाहायला मिळतं. असाच प्रकार मावळ मतदारसंघातही सुरु असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवरच बोलताना आमदार सुनील शेळके यांनी इच्छुक उमेदवारांसह विरोधकांना इशारा दिला. मात्र, यानंतर बोलताना अजित पवार म्हणाले, "आज आमच्या सुनील शेळके यांची गाडी जरा गरम होती. पण जरा सबुरीनं घ्यायचं.

## पिंपरी-चिंचवड शहरातील तिनही मतदार संघात निवडणुक लढविण्याचा

# राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा संकल्प!

## एकमताने शहर कार्यकारणीचा ठराव

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरात शरदचंद्र पवार यांना मानणारा मतदार मोठ्या प्रमाणात आहे. तीनही विधानसभेत पक्षाचे उमेदवार मोठ्या ताकदीने विजयी होऊ शकतात. शहरात शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन व्यापक आणि सर्वसमावेश वाढलेले आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात ठराव बैठक झाली. सदर बैठकीत शहरातील तीनही विधानसभा पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने लढाव्यात व निष्ठावंतांना प्रथम प्राधान्याने उमेदवारी देण्यात यावी असा सर्व प्रमुख शहर पदाधिकारी, सेल, फ्रंटल प्रमुख, पिंपरी, चिंचवड, भोसरी विधानसभा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकमताने ठराव मंजूर केला.**




सदर ठराव पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि पक्ष संसदीय मंडळाला ठराव प्रत देण्यात येणार आहे. यावेळी शहरातील सर्व मुख्य कार्यकारणी पदाधिकारी, सेल, फ्रंटल प्रमुख, पिंपरी चिंचवड, भोसरी विधानसभा प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. चिंचवड मतदार संघातून शहराध्यक्ष तुषार कामठे, महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, पिंपरी मतदार संघातून माजी नगरसेविका डॉ. सुलक्षणा शिलवंत धर, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, सामाजिक न्याय विभाग प्रमुख मयूर जाधव, सचिन गायकवाड आणि भोसरी विधानसभेतून माजी स्थायी समिती सभापती अजित गव्हाणे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, दत्ता जगताप हे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने इच्छुक असून सदर उमेदवारांचे नावे पाठवण्यात येणार आहेत.

सदर बैठकीत पक्षाचे प्रदेश सचिव प्रशांत सपकाळ, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, कार्याध्यक्ष विशाल काळभोर, कार्याध्यक्ष संतोष कवडे, काशिनाथ जगताप (वरिष्ठ उपाध्यक्ष), वरिष्ठ उपाध्यक्ष धम्मराज साळवे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, भोसरी विधानसभा अध्यक्ष ज्ञानेश आल्हाट, सूचक इम्रान शेख (युवक अध्यक्ष), अनुमोदक ज्योती निंबाळकर (महिलाध्यक्ष), राहुल आहेर (विद्यार्थी शहर अध्यक्ष), अरुण थोपटे (सेवादल अध्यक्ष), विशाल जाधव (ओबीसी विभाग अध्यक्ष), मयुर जाधव (सामाजिक व न्याय विभाग अध्यक्ष), अल्ताफ शेख (अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष), शाऊल कांबळे (ख्रिश्चन सेल अध्यक्ष), विजयकुमार कालिदास पिरंगुटे (व्यापारी व उदयोग व्यापार सेल), डॉ. सुनिल चव्हाण (वैदयकीय सेल अध्यक्ष), राहुल गोडसे (आयटी सेल अध्यक्ष), ॲड. संतोष शिंदे (लीगल सेल अध्यक्ष), गणेश काळे (झोपडपट्टी सेल अध्यक्ष ), कैलास बनसोडे (सरचिटणीस ), अधिकराव चव्हाण (सचिव शहर), वंदना दीपक आराख (अध्यक्ष असंघटित घरेलू कामगार), संजय पडवळ (अध्यक्ष ग्राहक संरक्षण समिती) व इतर पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

### बाजारपेठेतील गर्दीवर परिणाम!

युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले, शरदचंद्र पवार साहेब हे दूरदृष्टीचे नेते असून ते नक्कीच आम्हा निष्ठावंतांना न्याय देतील. आमचे शहराध्यक्ष तुषारभाऊ कामठे हे आमच्या शहर पक्ष संघटनेचे पालक असून त्यांचे मार्गदर्शन आम्हाला आहे. आम्ही सर्व पक्षातील आघाडी, सेल त्यांच्या पाठीशी ताकदीने उभे आहोत. महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या माध्यमातून निष्ठावंतांना उमेदवारी मिळावी. या ठरावानुसार ज्या उमेदवाराला संधी मिळेल त्यांचा पक्ष संघटना म्हणून आम्ही शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या नेतृत्वात पूर्ण तयारीने काम करू.

---

## ‘ऑनलाइन’ स्वरूपात मालमत्तेबाबत हरकतीचा निपटारा सुखकर..!

## करसंकलन विभागाकडून ‘क्यूआर कोड’चा वापर करण्याचे मालमत्ताधारकांना आवाहन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील सर्व प्रकारच्या मालमत्तांचे, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यामध्ये ८,५५,१०२ मालमत्तांना सलग अनुक्रमांक (जिओ सिक्वेन्सिंग) देण्यात आले असून ५,३२,३०७ मालमत्तांचे अंतर्गत मोजमाप करण्यात आले आहे. मालमत्ता सर्वेक्षणांतर्गत करण्यात आलेल्या मोजमाप प्रक्रियेमध्ये नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांपैकी ५२,७८७ मालमत्तांपर्यंत विशेष नोटिस १ चे वाटप करण्यात आले असून यामधील २२,५८२ मालमत्ताधारकांनी हरकती दाखल केल्या असून त्यापैकी १६,९५३ मालमत्ताधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असून त्यांना अंतिम बिल मिळाले आहे. यामधील ४,२६१ मालमत्ताधारकांनी ८,९९५४,२८९ रुपये कराचा भरणा केला असून ४,१३४ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरुपात कर भरुन त्यावरील सवलतींचा लाभ घेतला आहे.**




> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागामार्फत शहरात सर्वच मालमत्तेचे सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षणांर्गत नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांना विशेष नोटिस १ वाटप करण्यात येत आहे. ज्या मालमत्ताधारकांना आपल्या नोटिसवर हरकती नोंदवायच्या असतील, अशा मालमत्ताधारकांनी नोटिसवर दिलेल्या ‘क्यूआर कोड’द्वारे ऑनलाइन पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करावी. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेकडून ऑनलाइन पद्धतीने जलद गतीने निपटारा करण्यात येत असून त्याचा लाभ घ्यावा.
>
> –**शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

### ऑनलाइन पद्धतीने हरकत दाखल करणे आहे ‘सोपे’..

आत्तापर्यंत विशेष नोटिस १ मिळालेल्या मालमत्ताधारकांपैकी २२,५८२ मालमत्ताधारकांनी हरकती दाखल केल्या असून यापैकी २०,४७५ मालमत्ताधारकांनी ऑफलाइन पद्धतीने, तर २,१०६ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात हरकती दाखल केल्या आहेत. नागरिकांनी मिळालेल्या नोटिसवरील ‘क्यूआर कोड’ स्कॅन करून ऑनलाइन पद्धतीनेच नोटिस मान्य करून आपले बिलसुद्धा प्राप्त करावे व त्यानंतर आपला मालमत्ताकराचा भरणाही ऑनलाइन स्वरूपात करण्यासाठी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासोबतच ज्या नागरिकांना मालमत्तेबाबत हरकत दाखल करावयाची असेल त्यांनी ऑनलाइनरीत्या हरकत दाखल केल्यानंतर त्यावर तत्काळ निपटारा आणि हरकतीवर सुनावणीसुद्धा ऑनलाइन स्वरूपात घेण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे. नागरिकांनी हरकत दाखल करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर हरकतीवर सुनावणीची प्रक्रिया करण्यात येणार आहे, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

### विशेष नोटिस 1 प्राप्त झाल्यानंतर हरकतींसाठी 21 दिवसांची मुदत..

ज्या मालमत्ताधारकांना विशेष नोटिस १ प्राप्त झाल्यानंतर नोटिस अमान्य असल्यास हरकत दाखल करण्यासाठी २१ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. मालमत्ताधारकांनी आपल्या मालमत्तेबाबत, करयोग्य मूल्य मान्य नाही, आकारणी दिनांक मान्य नाही, करपात्र क्षेत्रफळ मान्य नाही, मालमत्तेवरील नावामध्ये चूक, मालमत्तेवरील पत्ता चुकीचा, मोबाइल क्रमांक व ई-मेल आयडी चुकीचा इत्यादीबाबत हरकती दाखल करता येत आहेत. नागरिकांनी अशा हरकतींबाबत आवश्यक कागदपत्रांची ऑनलाइन पद्धतीनेच पूर्तता करून हरकतीवर सुनावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष नोटिस प्राप्त झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत वरील हरकती असतील तर त्या दाखल करणे आवश्यक असणार आहे, असे आवाहन करसंकलन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### नव्या आकारणी झालेल्या मालमत्तांना करावर ‘सवलती’...

ज्या मालमत्तांची चालू वर्षी नव्याने आकारणी झाली आहे, अशा मालमत्तांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांपर्यंत विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये मालमत्ताधारकांनी आगाऊ कर भरल्यास ५ टक्के तर ऑनलाइन स्वरूपात कर भरल्यास ५ टक्के, महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी घरास ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेस ५० टक्के, झिरो वेस्ट आणि ‘एसटीपी प्लँट’ कार्यान्वित असल्यास १० टक्के, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारल्यास २ टक्के, ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १० टक्क्यांच्या सवलतींचा लाभ घेता येणार आहे.



भूमिका

# आभास की दुनिया के दोस्तो...

**‘ग्लोबल वॉर्मिंग’च्या संकटाची खात्री सगळ्यांनाच पटल्यामुळे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, विविध देशांतले ट्रस्ट वगैरे अनेकांना पर्यावरणासाठी ‘काही तरी’ करायचं असतं. तसे प्रयत्न जे कोणी करतील त्यांना बक्कळ आर्थिक साह्य मिळतं. तरीही पृथ्वीची तडफड थांबत नाही...**

त्रकारितेत आलो तेव्हापासून दोनचार शब्दप्रयोगांचा वापर सातत्यानं सुरू आहे. ‘ग्रीनहाऊस गॅसेस’, ‘पृथ्वीभोवतीचा ओझोन थर’ आणि ‘क्लोरोफ्लुरोकार्बन्स’. त्या वेळी या विषयावर ‘आकाशवाणी’वर बरेच कार्यक्रम केले. जयंत एरंडे यांच्याकडे नुकतीच मुंबई आकाशवाणीची धुरा आलेली. विज्ञान विषयावर बरंच काही करायची त्यांची इच्छा आणि आपली विज्ञान पार्श्वभूमी दाखवण्याची आम्हा काहींची हौस असं ते समीकरण छान जुळलं. सुरुवातीच्या धडपडत्या काळात या विषयांनी बराच हात दिला. ‘ग्लोबल वॉर्मिंग’ हा शब्द फॅशनेबल होण्याआधीचा हा काळ!पुढे काय झालं हे नव्यानं सांगायची गरज नाही. ‘ग्लोबल वॉर्मिंग’चं गांभीर्य हळूहळू सगळ्यांना समजलं. नंतर हा विषय प्रत्येक जागतिक कार्यक्रमपत्रिकेत पहिल्या क्रमांकावरचा झाला. वसुंधरेच्या वाढत्या तपमानानं जगाची झोप उडवली. कर्ब उत्सर्जन थांबवायचं जाऊ द्या... ते कमी कसं करता येईल, आपल्या घरातले रेफ्रिजरेटर,



एअरकंडिशनर वगैरेतून बाहेर येणारे क्लोरोफ्लुरोकार्बन्स कमी कसे करता येतील यावर साऱ्या जगाची चर्चा सुरू आहे. पृथ्वीभोवती असलेला ओझोनचा थर अधिक पातळ होणार नाही यासाठी काय काय करायला हवं यासाठी आता परिषदा झडतायत. शास्त्रज्ञ विविध मार्ग सुचवतायत वगैरे असं बरंच काही सुरू आहे. थोडक्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखे काही नरपुंगव सोडले तर सगळ्यांनाच ‘ग्लोबल वॉर्मिंग’ आणि त्यामुळे समोर आ वासून उभ्या ठाकलेल्या संकटाची खात्री पटलीये. या सगळ्यात- म्हणजे पृथ्वीचं तापमान वाढवण्यात- एका घटकाचा वाटा फारच महत्त्वाचा आहे असं लक्षात आलं. कर्ब. म्हणून ज्याच्या ज्याच्यातून कार्बन डायऑक्साइड बाहेर पडतो त्या सगळ्यांचा वापर कमी करायचा, अशी जागतिक टूम निघाली.यात सगळ्यात पहिल्या क्रमांकावर होते हायड्रोकार्बन्सचे घटक. म्हणजे पेट्रोल, डिझेल, रॉकेल, नाफ्ता, डांबर, इत्यादी. साहजिकच या सगळ्यांसाठी पर्याय शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले. मग कोणी म्हणालं इथेनॉल अधिकाधिक वापरा. कोणी म्हणालं हायड्रोजन हे पुढचं इंधन आहे. सौर-ऊर्जाप्रेमी तर सगळ्यात चेकाळले. यांच्यापैकी कोणी घराच्या गॅलरीत सौरचुलीवर शेंगदाणे, रवा वगैरे भाजलेला असतो. अधिक प्रगतिशील असतात त्यांच्या शेतघरी किंवा गावाकडच्या घरी ‘सोलर हीटर’वर पाणी गरम होत असतं. त्यामुळे सौर ऊर्जा हा सगळ्या इंधन समस्येवरचा रामबाण इलाज आहे यावर त्यांची खात्री पटलेली असते. पेट्रोल, डिझेलच्या बरोबरीने आणखीही एक इंधनप्रकार बंद करायला हवा, यावर या सगळ्यांचं एकमत असतं. तो प्रकार म्हणजे कोळसा. कोळसा नकोच आपल्याला, असंच या सगळ्यांचं म्हणणं असतं. त्या ओंगळ खाणी, परिसरात पसरणारी खाणीतली धूळ आणि एकंदरच होणारी खाण परिसराची धूळधाण त्यांना अस्वस्थ करत असते. तसं त्यांचं बरोबरही असतंच. त्यात आता तर आपण ‘२०३० सालापर्यंत आपल्या ऊर्जा गरजांचा ५० टक्के वाटा हा कर्बशून्य मार्गांतून भागवू’ अशी प्रतिज्ञा केलेली आहे. म्हणजे पुढल्या फक्त सहा वर्षांत हे उद्दिष्ट साध्य करण्याचा आपला निर्धार आहे. परत २०७० पर्यंत आपल्या पंतप्रधानांनी देशास ‘कार्बन न्यूट्रल’ करण्याची घोषणा केलीये. त्यामुळेही अनेकांच्य स्व-अभिमानात भर पडलीये. अर्थात या अभिमानधारींतील अनेकांना ‘कार्बन न्यूट्रल’ म्हणजे काय, हे कदाचित माहीत नसेल. पण अभिमान बाळगायला काही माहिती असावी लागते असा कुठे नियम आहे? या उद्दिष्टपूर्तीसाठी पुढच्या ४०-४५ वर्षांत आपल्याला आपल्या विद्यामान सौर आणि पवन ऊर्जा क्षमतेत तब्बल ७० पटींनी वाढ करावी लागणार आहे. ती झाली तर या मार्गांनी होणारी वीज ७७०० गिगावॅट इतकी होईल..तर २०७० पर्यंत ७,७०,००० वॅट इतकी महाऊर्जा आपण पर्यावरणस्नेही मार्गांनी निर्माण करू शकू, असा आपला पण आहे. आणि ‘...तो मुमकीन है’ अशी आपली खात्री असल्यानं या शक्याशक्यतेची चर्चा करायची गरजच काय?

## प्रादेशिक »

### ‘अभिजात’तेचे भोक!

***मराठी भाषा अधिकृतरीत्या अभिजात झाल्यामुळे आपल्या सांस्कृतिक आयुष्यात फरक पडणार आहे का आणि कोणता? त्या फरकात आपले योगदान काय?***

जातिवंत अभिजाततेच्या बळावर शेकडो वर्षांची वैभवशाली भाषिक परंपरा निर्माण करणाऱ्या मायमराठीला अखेर ती अभिजात असल्याची मान्यता दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानायचे तर पुढील महिन्यात होऊ घातलेली विधानसभा निवडणूक नजरेआड करता येत नाही. अर्थात कोणत्या का निमित्ताने होईना, गेली अनेक वर्षे सुरू असलेले अनेकांचे अथक प्रयत्न मार्गी लागले आणि तमीळ, संस्कृत, कन्नड, मल्याळम् आणि उडिया यांच्याप्रमाणेच मराठीही आता अधिकृतपणे अभिजात भारतीय भाषा झाली, याबद्दल समस्त मराठी जनांचे अभिनंदन. आता हा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडून दरवर्षी १०० कोटी रुपयांपर्यंतचा निधी अपेक्षित असून त्यामधून राज्य सरकारने मराठी भाषेच्या विकासासाठी काम करणे अपेक्षित आहे.

पंतप्रधानांनी २०४७ पर्यंत ‘विकसित भारता’चे स्वप्न आपल्यासमोर ठेवले आहे. ‘विकसित भारत’ म्हणजे फक्त जीडीपीमधील वाढ नव्हे, तर सामान्य माणसापर्यंत विकासाचे फायदे पोहोचणे आणि सर्वांना रोजगारसंधी मिळणे हेही अपेक्षित आहे.

# विकसित भारता’चे स्वप्न आणि ‘व्यवस्थे’चे वास्तव

परंतु आज सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यासाठी लागणारे विचार, विज्ञान व नियोजन बळ आपल्यापाशी आहे का, हा मोठा प्रश्न आहे. त्याचे उत्तर शोधण्यासाठी सध्याची राजकीय, आर्थिक आणि ज्ञाननिर्मितीची व्यवस्था नेमकी कशी आहे आणि त्यात हे प्रश्न नेमके कसे व कुठे बसतात, व ते सोडवण्यात अडचणी काय, याचे समीक्षण करणे हा या लेखाचा उद्देश.सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातल्या प्रश्नांची उदाहरणे : ‘माझी बस का उशिरा येते?’ हा एसटीने प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनीला पडणारा प्रश्न. ‘माझ्या विहिरीतील पाणी लवकर का आटते?’ हा मराठवाडयातील छोटया शेतकऱ्याचा प्रश्न. ‘मी बनवलेल्या फर्निचरला मागणी का नाही?’ हा शहरातील सुतारकाम-उद्योजकाला पडणारा प्रश्न. त्याचप्रमाणे ‘बारावीच्या मार्कावर माझ्या मुलीला डॉक्टर का होता येत नाही?’ हे सर्व भारतातील बहुतांश लोकांच्या रोजच्या जीवनातले



प्रश्न आहेत. यांना आपण ‘मूलभूत भौतिक प्रश्न’ असे म्हणूया. आपली राजकीय व प्रशासकीय परिस्थिती बघितली तर घटनेप्रमाणे, केंद्रीय व्यवस्थेला सर्वोच्च स्थान आणि राज्यव्यवस्थेला दुय्यम स्थान आहे. केंद्रीय व्यवस्थेत केंद्र शासनाकडे, आणि त्यातही विशेषत: पंतप्रधान पदाकडे सत्तेचे आत्यंतिक केंद्रीकरण झालेले आहे. केंद्र शासनाचे विभाग व उपक्रम, ‘आयएएस’प्रणीत प्रशासन व्यवस्था, आयआयटी आदी उच्चशिक्षण संस्था, भारतीय हवामान विभाग अशा वैज्ञानिक संस्था मिळून ही राष्ट्रीय व्यवस्था चालवतात. दुष्काळ जाहीर करण्यापासून खाद्यपदार्थांची चाचणी याचे तांत्रिक निकष व सर्वेक्षण पद्धती या संस्था ठरवतात. स्थानिक पातळीवर उपयोगी पडणारे ज्ञान निर्माण करण्याचे राज्यांचे अधिकार खूपच मर्यादित आहेत आणि ज्ञाननिर्मितीची क्षमताही कमी आहे. अशा केंद्रीकृत व्यवस्थेत कार्यकारी अधिकार हे वरच्या पातळीवर एकवटतात. वैद्यकीय पदवीच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवरची एकच परीक्षा, हे अशा अधिकारांच्या केंद्रीकरणाचेच उदाहरण. या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेचे लोकसभा व राज्यसभा यांना उत्तरदायित्व अत्यंत कमी आहे. राहिलेच, तर ते सर्वोच्च न्यायालय आणि काही प्रमाणात प्रसारमाध्यमांशी आहे. अनेक क्षेत्रांत वस्तुनिष्ठ माहितीचा अभाव दिसतो तो यामुळे. राज्यांच्या सार्वजनिक बस सेवेचा तुलनात्मक अभ्यास, रेल्वे अपघातांचे विश्लेषण अथवा कोविड-बळींची अधिकृत टक्केवारी यात राज्याराज्यांमधील मोठी तफावत याची कारणमीमांसा – असे अभ्यास क्वचितच मांडले जातात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मोदी नवरात्रीत करतात कडक उपवास!

## पंतप्रधान दरवर्षी माँ दुर्गेची पूजा करतात : देवेंद्र फडणवीस

**। बारामती ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशभरात गुरुवारपासून नवरात्रीच्या उत्सवाला सुरूवात झाली आहे. नवरात्रीच्या उत्सवामध्ये घरोघरी घटस्थापना करण्यात येत असते. तसेच मंदिरांमध्ये देखील देवींची स्थापना करण्यात येत असते. या नवरात्रीमध्ये अनेकजण उपवास करत असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील नऊ दिवस उपवास करतात. गेल्या अनेक वर्षांपासून पंतप्रधान मोदी हे नवरात्रीचे व्रत करत दरवर्षी माँ दुर्गेची पूजा करतात.**





दरम्यान, आज पंतप्रधान मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांच्या हस्ते ठाणे, मुंबई, वाशीममध्ये कोट्यवधी रुपयांच्या विविध विकास कामांचं उद्घाटन पार पडलं. या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे आभार मानले. तसेच सध्या नवरात्रीचा उत्सव सुरु असल्याचं सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील ९ दिवसांचा उपवास करत असून ते फक्त पाणी पितात. फक्त पाणी पिऊन ते उपवास करतात, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.यावेळी फडणवीस यांनी महाविकास आघाडीसह उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. मुंबईतील मेट्रो-३ ला महाविकास आघाडीने स्थगिती दिली होती. मात्र, या मेट्रोसाठी हजारो कोटी रुपये खर्च केले. पण तरीही त्यांनी स्थगिती दिली. या मेट्रोबाबत सर्वोच्च न्यायालयानेही सांगितलं होतं की, पर्यावरणाचं संवर्धन करणारी मेट्रो आहे. पण उद्धव ठाकरेंचा इगो दुखावला आणि त्यांनी त्या मेट्रोला स्थगिती दिली.

मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आपलं सरकार आल्यानंतर लगेच पहिल्या टप्प्याचं काम पूर्ण करण्यात आलं", असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. महिन्याभरात तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात आले आहेत. विदर्भातील कार्यक्रम आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी ठाणे येथील कार्यक्रमासाठी दाखल झाले होते. ठाण्यात आल्यानंतर त्यांनी उपस्थित जनतेशी मराठीतून संवाद साधला. तसंच, महाराष्ट्रासाठी आनंदाची बातमी घेऊन आलोय, असं म्हणत त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. दरम्यान, ठाणे शहरातील अंतर्गत मेट्रो प्रकल्पासह छेडा नगर-ठाणे पूर्वमुक्त मार्ग (विस्तारीत) प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ठाण्यात आले होते. यावेळी जनतेशी संवाद साधताना पंतप्रधान म्हणाले, "कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरगडची आई रेणुका आणि वणीची सप्तश्रृंगी देवी यांना मी कोटी कोटी वंदन करतो. मी ठाण्याच्या धरतीवर कोपिनेश्वर मंदिरच्या चरणी प्रणाम करतो. मी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनाही नमन करतो", असं पंतप्रधान मोदी यांनी यावेळी बोलताना म्हटलं.दरम्यान, आज पंतप्रधान मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांच्या हस्ते ठाणे, मुंबई, वाशीममध्ये कोट्यवधी रुपयांच्या विविध विकास कामांचं उद्घाटन पार पडलं. या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे आभार मानले. तसेच सध्या नवरात्रीचा उत्सव सुरु असल्याचं सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील ९ दिवसांचा उपवास करत असून ते फक्त पाणी पितात. फक्त पाणी पिऊन ते उपवास करतात, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.यावेळी फडणवीस यांनी महाविकास आघाडीसह उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. मुंबईतील मेट्रो-३ ला महाविकास आघाडीने स्थगिती दिली होती. मात्र, या मेट्रोसाठी हजारो कोटी रुपये खर्च केले. पण तरीही त्यांनी स्थगिती दिली. या मेट्रोबाबत सर्वोच्च न्यायालयानेही सांगितलं होतं की, पर्यावरणाचं संवर्धन करणारी मेट्रो आहे. पण उद्धव ठाकरेंचा इगो दुखावला आणि त्यांनी त्या मेट्रोला स्थगिती दिली.

### कोटींच्या प्रकल्पांचे भूमिपूजन

मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आपलं सरकार आल्यानंतर लगेच पहिल्या टप्प्याचं काम पूर्ण करण्यात आलं", असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.महिन्याभरात तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात आले आहेत. विदर्भातील कार्यक्रम आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी ठाणे येथील कार्यक्रमासाठी दाखल झाले होते. ठाण्यात आल्यानंतर त्यांनी उपस्थित जनतेशी मराठीतून संवाद साधला. तसंच, महाराष्ट्रासाठी आनंदाची बातमी घेऊन आलोय, असं म्हणत त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली.


---

# "विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवा"

## पंतप्रधान मोदींचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**। मुंबई ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. काही दिवसांमध्ये निवडणूक जाहीर होणार आहे. त्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. आचारसंहिता लागण्याच्या आधी नेत्यांनी विविध विकासकामांच्या उद्घाटनांचा धडाका लावला आहे.**



या पार्श्वभूमीवरच पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ठाण्यात विविध विकास कामांचं उद्घाटन पार पडलं. यावेळी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. "महाविकास आघाडीने विकासकामे रोखण्याचा प्रयत्न केला, पण आता विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवण्याचं काम करा", असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे."आज एक मोठी आनंदाची बातमी घेऊन महाराष्ट्रात आलो आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. हा फक्त महाराष्ट्राचा आणि मराठीचा सन्मान नाही तर मराठी साहित्य कला आणि संस्कृतीचा देखील सन्मान आहे. मी देशातील सर्व मराठी बोलणाऱ्यांना शुभेच्छा देतो. ठाण्यात येण्याच्या आधी मी वाशिममध्ये होतो. त्या ठिकाणी नऊ कोटी शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी जारी करण्याचा योग मला प्राप्त झाला. आजच्या दिवसाची अनेक लोक वाट पाहत होते", असं मोदी म्हणाले.

### पंतप्रधान मोदी काय म्हणाले?

"आम्हाला विकास करायचा आहे आणि याआधी काँग्रेसने केलेल्या खड्यांनाही भरायचं आहे. विकसित भारत हे एनडीए सरकारचं लक्ष्य आहे. असे अनेक काम आहेत ते आम्ही मार्गी लावले आहेत. आमच्या सरकारने ही स्थिती बदलण्याचा प्रयत्न केला आहे. मपंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, "महाविकास आघाडीला संधी मिळाली. की ते विकासाचे काम थांबवण्याचे काम करतात. मुंबई मेट्रो हे देखील त्याचच एक उदाहरण आहे. महाविकास आघाडीला फक्त विकास थांबवण्याचं काम येतं. मात्र, विकासकाम थांबवणाऱ्यांना आता सत्तेपासून लांब ठेवा.

# छत्तीसगडमध्ये 40 नक्षलवादी ठार!

## अबूझमाडच्या जंगलात मोठ्या घातपाताचा कट उधळला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगडच्या दंतेवाडा-नारायणपूर सीमावर्ती भागातील दक्षिण अबूझमाडमध्ये शुक्रवारी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ४० नक्षलवादी ठार झाले. रात्री उशिरापर्यंत ही चकमक सुरू होती. घटनास्थळावरून मोठा शस्त्रसाठाही हस्तगत करण्यात आला आहे. अलिकडच्या काळातील ही सर्वांत मोठी कारवाई असून यामुळे माओवादी चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.**



गडचिरोलीपासून सुमारे अडीचशे किलोमीटर दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात दक्षिण अबूझमाडमध्ये काही नक्षलवादी दबा धरून बसल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार दोन्ही जिल्ह्यांच्या सुरक्षा यंत्रणांनी संयुक्तपणे शोधमोहीम हाती घेतली होती. त्यावेळी नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार सुरू केला.

जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिल्यानंतर अनेक तास चकमक झडली. आतापर्यंत ४० नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले असून एके-४७, एसएलआरसह अन्य शस्त्र व साहित्याचा मोठा साठा आढळून आल्याची माहिती पोलिसांनी दिली. सर्व जवान सुरक्षित असल्याची माहिती आहे. या वर्षभरात छत्तीसगडमध्ये तब्बल १९० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले असून ६६९ जणांना अटक करण्यात आली आहे. ६५६ माओवाद्यांनी या काळात आत्मसमर्पण केले आहे.

नक्षलवादाचा नायनाट करण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या वर्षीपासून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्या अनुषंगाने नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात गुप्तचरावर आधारित कारवाईसाठी तसेच दुर्गम गावांमध्ये विकासकामे करण्यासाठी नागरी अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी फॉरवर्ड ऑपरेटिंग बेस (एफओबी) उघडण्यास गती दिली आहे. गेल्या वर्षी डिसेंबरपासून ३३ एफओबी स्थापन करण्यात आले आहेत. या माध्यमातून नक्षलवाद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांना मोठी मदत होत आहे. अबूझमाड हा नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला असून तेथूनच गडचिरोलीसाठी घातपाती कारवायांचा कट रचला जातो. या पार्श्वभूमीवर या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे गडचिरोलीशी काही संबंध आहेत का, याची चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र अद्याप संबंधित नक्षल्यांचा गडचिरोलीशी संबंध असल्याची माहिती समोर आलेली नसल्याचे गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी सांगितले. या चकमकीनंतर गडचिरोलीमधील सुरक्षा यंत्रणाही सतर्क झाली आहे. नक्षल्यांनी जिल्ह्यात प्रवेश करु नये, यासाठी सुरक्षा यंत्रणा खडा पहारा देत आहेत.

चकमकीत ठार झालेल्या नक्षल्यांची नेमकी संख्या अजून स्पष्ट झालेली नाही. एकेक मृतदेह शोधून जंगलाबाहेर काढण्याचे काम सुरू आहे. मृत नक्षल्यांची ओळख पटल्याशिवाय त्यांचा महाराष्ट्रातील घातपाती कारवायांत सहभाग होता किंवा नाही हे सांगता येणार नाही.

गडचिरोलीपासून सुमारे अडीचशे किलोमीटर दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात दक्षिण अबूझमाडमध्ये काही नक्षलवादी दबा धरून बसल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार दोन्ही जिल्ह्यांच्या सुरक्षा यंत्रणांनी संयुक्तपणे शोधमोहीम हाती घेतली होती. त्यावेळी नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार सुरू केला. जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिल्यानंतर अनेक तास चकमक झडली. आतापर्यंत ४० नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले असून एके-४७, एसएलआरसह अन्य शस्त्र व साहित्याचा मोठा साठा आढळून आल्याची माहिती पोलिसांनी दिली. सर्व जवान सुरक्षित असल्याची माहिती आहे. या वर्षभरात छत्तीसगडमध्ये तब्बल १९० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले असून ६६९ जणांना अटक करण्यात आली आहे. ६५६ माओवाद्यांनी या काळात आत्मसमर्पण केले आहे.

### सरकारने आक्रमक भूमिका घेतली

नक्षलवादाचा नायनाट करण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या वर्षीपासून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्या अनुषंगाने नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात गुप्तचरावर आधारित कारवाईसाठी तसेच दुर्गम गावांमध्ये विकासकामे करण्यासाठी नागरी अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी फॉरवर्ड ऑपरेटिंग बेस (एफओबी) उघडण्यास गती दिली आहे. गेल्या वर्षी डिसेंबरपासून ३३ एफओबी स्थापन करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे गडचिरोलीशी काही संबंध आहेत का, याची चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र अद्याप संबंधित नक्षल्यांचा गडचिरोलीशी संबंध असल्याची माहिती समोर आलेली नसल्याचे गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी सांगितले.

# 'इस्रायलनं इराणच्या अणुआस्थापनांवर हल्ले करावेत'

## आशियातील तणाव कमी करण्यावर बायडेन यांनी भर दिला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे यंदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलला इराणच्या अणुआस्थापनांवर हल्ला सर्वात आधी हल्ला करण्याचा सल्ला दिला आहे. नॉर्थ कॅरोलिना येथे प्रचार सभेत बोलत असताना ट्रम्प यांनी हे विधान केले. विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी दोन दिवसांपूर्वी मध्य आशियातील सर्व देशांना युद्धातून बाहेर पडण्याची सूचना दिली होती, त्यानंतर ट्रम्प यांचे हे विधान समोर आले आहे.**




इस्रायल आणि इराण यांच्यामधील संघर्ष थांबवून मध्य आशियातील तणाव कमी करण्यावर बायडेन यांनी भर दिला होता.इराणकडून दोन दिवसांपूर्वी इस्रायलवर २०० बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागली होती. यातील बहुतेक क्षेपणास्त्र इस्रायलच्या आर्यन डोम यंत्रणेने हवेतच निकामी केली. त्यानंतर इस्रायल इराणवर हल्ला करणार असल्याचे नेत्यानाहू यांनी जाहीर केले होते. ट्रम्प यांनी आपल्या भाषणात बायडेन यांच्या पत्रकार परिषदेचा उल्लेख केला. पत्रकारांनी बायडेन यांना विचारले की, तुम्ही इराणच्या बाबतीत काय विचार करता? इस्रायलच्या जागी तुम्ही असता तर काय केले असते? यावर बायडेन म्हणाले की, माझ्या माहितीप्रमाणे ते अणुआस्थापनांवर तरी हल्ले करणार नाहीत. या संभाषणाचा हवाला देऊन ट्रम्प म्हणाले, "पण अणुआस्थापनांवर तर सर्वात आधी हल्ले केले पाहीजेत ना?" ट्रम्प पुढे म्हणाले, "तुम्हाला सर्वात आधी अण्वस्त्रावर हल्ले चढवावे लागतील. कारण अण्वस्त्र हीच सर्वात मोठी चिंता आहे. जो बायडेन यांनी इस्रायलला सांगायला हवे होते की, तुम्ही इराणच्या अणुआस्थापनांवर हल्ले करा आणि त्यानंतरचे नंतर बघून घेऊ." जर इस्रायलला हल्ला करायचा असेल तर ते नक्कीच करतील. पण त्यांच्या काय योजना आहेत, यावर आपले लक्ष असायला हवे, असेही ट्रम्प म्हणाले.राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी दोन दिवसांपूर्वीच मध्य आशियात युद्ध होण्याची शक्यता नाकारली होती. त्यानंतर ७८ वर्षीय ट्रम्प यांनी त्यांचा दावा खोडून काढला आहे. लेबनान आणि इराण इस्रायलला डिवचत असल्यामुळे मध्य आशियात युद्ध भडकण्याची शक्यता आहे का?

### हल्ला करण्याचा दिला सल्ला

असा प्रश्न बायडेन यांना विचारण्यात आला होता. यावर बायडेन म्हणाले होते, आज पाऊस पडेल की नाही याबाबत तुम्हाला किती विश्वास वाटतो? पण मला मात्र मध्य आशियात युद्ध होणार नाही, याचा पूर्ण विश्वास आहे. कारण मला वाटते आपण हे टाळू शकतो. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे यंदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलला इराणच्या अणुआस्थापनांवर हल्ला सर्वात आधी हल्ला करण्याचा सल्ला दिला आहे. नॉर्थ कॅरोलिना येथे प्रचार सभेत बोलत असताना ट्रम्प यांनी हे विधान केले.

# शारदीय नवरात्रोत्सवात पर्यटनासाठी 'या' ठिकाणांची करा निवड!

पुणे : भारतात नवरात्रीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. विशेषतः शारदीय नवरात्रीमध्ये दुर्गा मातेच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते. तसेच पूजेसाठी मंडप उभारले जातात. देशातील अनेक ठिकाणी गरबा कार्यक्रमांचे आयोजन केले जातेयंदा शारदीय नवरात्री 03 ऑक्टोंबर ते 11 ऑक्टोबर दरम्यान साजरा होता असून यादरम्यान अनेक सुट्ट्या आहेत. या दिवसांत तुम्हाला नवरात्रीचा आनंद घ्यायचा असेल, तर तुम्ही या ठिकाणांना भेट देवू शकता. आम्ही तुम्हाला हा सण अनुभवण्यासाठी काही उत्तम ठिकाणांची माहिती सांगत आहोत. या ठिकाणी तुम्ही भेट दिला तर कधीही नवरात्रीचा प्रसंग विसरणार नाही...






## वाराणसी

वाराणसी हे उत्तर प्रदेशातील सर्वात पवित्र शहरांपैकी एक आहे. येथे नवरात्रोत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. येथे हजारो दिवे वाराणसीच्या घाटांना प्रकाशित करतात. रामचरितमानसचे मंत्र दहा दिवस संपूर्ण शहरात गुंजतात. उत्तर प्रदेशातील नवरात्रीतीत रामलीला हा एक नृत्य प्रकार सर्वाधिक लोकप्रिय आहे. ते पाहण्यासाठी दरवर्षी लाखो लोक येतात.


## कोलकाता

नवरात्रोत्सव साजरा करण्यासाठी कोलकाता हे एक उत्तम ठिकाण आहे. नवरात्रीच्या काळात, पश्चिम बंगालच्या प्रत्येक कोपऱ्यात दुर्गा देवीच्या मोठ्या मूर्ती बनवता येतात. त्या मोठ्या पंडालमध्ये ठेवल्या जातात. कोलकात्यात नवरात्रोत्सव दुर्गा पूजा किंवा दुर्गोत्सव म्हणून ओळखला जातो.



## अहमदाबाद

गुजरातमधील नवरात्र हा जगातील सर्वात मोठा पारंपरिक नृत्य उत्सव आहे. या 9 दिवसांमध्ये गुजराती लोक चमकदार रंगाच्या कपड्यांमध्ये दांडिया आणि गरबाच्या तालावर नाचताना दिसतात. इथे गरबा नाईटला नक्की जावे, असे सांगितले जाते.



## म्हैसूर

नवरात्रीच्या दरम्यान कर्नाटकला भेट देण्याचे मुख्य कारण म्हणजे हजारो दिव्यांनी उजळून निघालेल्या म्हैसूर रॉयल पॅलेसला भेट देणे. दसऱ्याला येथे नधब्बा सण म्हणूनही ओळखले जाते. हा दहा दिवसांचा उत्सव आहे. ज्यामध्ये संपूर्ण म्हैसूरमध्ये अनेक नृत्यांचे प्रकार सादर केले जातात आणि गायनही होते.

## वैष्णो देवी मंदिर

श्री वैष्णोदेवी मंदिराची सजावट केली जाते. यानिमित्त लाखो लोक दर्शनासाठी येतात. कतारपासून 14 किमी अंतरावर उंच टेकडीवर असलेल्या वैष्णो देवी धाममध्ये 9 दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

# राहुल चहरच्या वडिलांची फसवणूक!

## एका बिल्डरकडून 26.50 लाख रुपयांची फसवणूक; जीवे मारण्याची धमकी

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेटपटू राहुल चहरचे वडील देशराज सिंह चहर याच्यासोबत फसवणुक झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. अहवालानुसार, एका बिल्डरने त्यांची २६.५० लाख रुपयांची फसवणूक केली आहे. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यांनी आता जगदीशपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आता त्यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. नरसी विलेजचे मालक वासुदेव गर्ग, कर्मचारी अरुण गुप्ता आणि पियुष गोयल यांनी एका जमिनीवर घर बांधण्यासाठी पैसे घेतले होते. पण त्यांनी ना नोंदणी केली ना घर बांधले. आरोपी जवळपास १२ वर्षांपासून कारणं देत आहेत.**




राहुल चहरच्या वडिलांनी कंपनीशी संबंधित तीन जणांवर जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे. १२ वर्षांपासून या प्रकरणाची काळजी वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदुस्थानच्या वृत्तानुसार, जेव्हा ते ५ जून २०२४ रोजी विक्रीच्या करारावर स्वाक्षरी करण्याच्या मागणीसाठी अरुण गुप्ता आणि पीयूष गोयल यांच्याशी शेवटचा संपर्क साधला, तेव्हा दोघांनीही त्यांना शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे त्याची पुन्हा भेट झाली नाही. डीसीपी सिटी सूरज कुमार राय यांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल चहरच्या वडिलांकडे घरासाठी दिलेल्या पैशांचा पुरावा आहे. त्याच आधारे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुराव्याच्या आधारे तपास करून कारवाई केली जाईल.

राहुल चहरचे वडील देशराज सिंह चहर यांनी मे २०२४ मध्ये याप्रकरणी तक्रार केली होती. यानंतर पोलिसांनी प्रथम तपास केला आणि जेव्हा बिल्डर भूखंडावर बांधलेले घर देण्यास तयार नव्हते, तेव्हा त्यांनी गुन्हा दाखल केला. राहुलच्या वडिलांच्या तक्रारीनुसार, कंपनीचे मालक वासुदेव गर्ग यांनी नरसी व्हिलेज नावाने वसाहत बांधली आहे. २०१२ मध्ये त्यांनी याच कॉलनीत दोन प्लॉट बुक केले होते, ज्यावर कंपनी घर बांधणार होती. बिल्डरने २०१६ मध्ये त्यातील एक भूखंड दुसऱ्याला विकला.राहुलच्या वडिलांना याची माहिती मिळताच त्यांनी वासुदेव गर्ग यांच्याकडे त्यांची अनामत रक्कम मागितली, ती त्यांना परत मिळाली. यानंतर देशराज सिंह यांनी २०१८ मध्ये मुलगा राहुल चहरच्या नावावर दुसरा प्लॉट हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला. त्यासाठी त्याच्याकडून ३२ हजार रुपये ट्रान्सफर फी घेण्यात आली, जो कंपनीने आजपर्यंत त्याच्याकडे सुपूर्द केलेला नाही. एवढेच नाही तर प्लॉटवर घर बांधण्यासाठी २६.५० लाखांची उर्वरित रक्कमही दिली आहे. मात्र, घर बांधून झाल्यानंतरही बिल्डरने ते त्यांना दिले नाही. त्यामुळे बिल्डर प्लॉटप्रमाणे घर दुसऱ्याला विकण्याची तयारीत असल्याचा आरोप, राहुल चहरच्या वडिलांनी केला आहे.राहुल चहरच्या वडिलांनी कंपनीशी संबंधित तीन

### 32 हजार रुपये ट्रान्सफर

बिल्डरने २०१६ मध्ये त्यातील एक भूखंड दुसऱ्याला विकला.राहुलच्या वडिलांना याची माहिती मिळताच त्यांनी वासुदेव गर्ग यांच्याकडे त्यांची अनामत रक्कम मागितली, ती त्यांना परत मिळाली. यानंतर देशराज सिंह यांनी २०१८ मध्ये मुलगा राहुल चहरच्या नावावर दुसरा प्लॉट हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला. त्यासाठी त्याच्याकडून ३२ हजार रुपये ट्रान्सफर फी घेण्यात आली, जो कंपनीने आजपर्यंत त्याच्याकडे सुपूर्द केलेला नाही. एवढेच नाही तर प्लॉटवर घर बांधण्यासाठी २६.५० लाखांची उर्वरित रक्कमही दिली आहे. मात्र, घर बांधून झाल्यानंतरही बिल्डरने ते त्यांना दिले नाही.

जणांवर जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे. १२ वर्षांपासून या प्रकरणाची काळजी वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदुस्थानच्या वृत्तानुसार, जेव्हा ते ५ जून २०२४ रोजी विक्रीच्या करारावर स्वाक्षरी करण्याच्या मागणीसाठी अरुण गुप्ता आणि पीयूष गोयल यांच्याशी शेवटचा संपर्क साधला, तेव्हा दोघांनीही त्यांना शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे त्याची पुन्हा भेट झाली नाही. डीसीपी सिटी सूरज कुमार राय यांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल चहरच्या वडिलांकडे घरासाठी दिलेल्या पैशांचा पुरावा आहे. त्याच आधारे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुराव्याच्या आधारे तपास करून कारवाई केली जाईल.राहुल चहरचे वडील देशराज सिंह चहर यांनी मे २०२४ मध्ये याप्रकरणी तक्रार केली होती. यानंतर पोलिसांनी प्रथम तपास केला आणि जेव्हा बिल्डर भूखंडावर बांधलेले घर देण्यास तयार नव्हते, तेव्हा त्यांनी गुन्हा दाखल केला.

राहुलच्या वडिलांच्या तक्रारीनुसार, कंपनीचे मालक वासुदेव गर्ग यांनी नरसी व्हिलेज नावाने वसाहत बांधली आहे. २०१२ मध्ये त्यांनी याच कॉलनीत दोन प्लॉट बुक केले होते, ज्यावर कंपनी घर बांधणार होती. बिल्डरने २०१६ मध्ये त्यातील एक भूखंड दुसऱ्याला विकला.राहुलच्या वडिलांना याची माहिती मिळताच त्यांनी वासुदेव गर्ग यांच्याकडे त्यांची अनामत रक्कम मागितली.

# इराणी करंडक जेतेपदाचं स्वप्न साकार

## आठव्या क्रमांकावर खेळणाऱ्या तनुष कोटियनची शतकी खेळी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात यशस्वी संघ असलेल्या मुंबईने २७ वर्षांनी इराणी कप २०२४ चे विजेतेपद पटकावले आहे. ही स्पर्धा रणजी करंडक विजेता मुंबई आणि रेस्ट ऑफ इंडिया यांच्यात खेळली गेली. दोन्ही संघांतील हा सामना अनिर्णित राहिला आणि पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर मुंबईला विजयी घोषित करण्यात आले.**




पाचव्या दिवशी आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्लाय तनुष कोटियनने शतकी खेळी साकारली. तत्पूर्वी पहिल्या डावात सर्फराझ खानच्या द्विशतकाच्या जोरावर मुंबईने ५३७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात अभिमन्यू ईसवरनच्या १९१ धावांच्या खेळीनंतरही रेस्ट ऑफ इंडिया ४१६ धावाच करता आल्या. ज्यामुळे मुंबईला १२१ धावांची आघाडी मिळाली होती.१९९७ नंतर प्रथमच मुंबईने इराणी चषकाचे विजेतेपद पटकावण्यात यश मिळवले आहे. मुंबईने इराणी चषकाचे विजेतेपद पटकावण्याची ही १५ वी वेळ आहे. या सामन्यात मुंबईने प्रथम

### अभिमन्यू ईसवरनची एकाकी झुंज

रेस्ट ऑफ इंडियाचे इतर फलंदाज फ्लॉप ठरले. या कारणामुळे रेस्ट ऑफ इंडियाला केवळ ४१६ धावा करता आल्या. पहिल्या डावात १२१ धावांनी पिछाडीवर पडल्यानंतर रेस्ट ऑफ इंडियाचा पराभव जवळपास निश्चित झाला होता.मुंबईकडून पृथ्वी शॉने दुसऱ्या डावात ७६ धावा केल्या. तनुष कोटियनने दुसऱ्या डावात आठव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावले. त्याने १५० चेंडूत ११४ धावा केल्या.

फलंदाजी केली. मुंबईने पहिल्या डावात ५३७ धावा केल्या होत्या, तर उ रेस्ट ऑफ इंडिया ४१६ धावा करण्यात यशस्वी ठरला. पहिल्या डावात सर्फराझशिवाय कर्णधार रहाणेने ९७ धावांची खेळी खेळली होती.कर्णधार ऋतुराज गायकवाड पहिल्या डावात रेस्ट ऑफ इंडियासाठी काही खास कामगिरी करु शकला नाही आणि 9 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. अभिमन्यू ईसवरनने १६ चौकार आणि १ षटकारासह १९१ धावा केल्या. ध्रुव जुरेलने ९३ धावांची खेळी केली. इशान किशनला केवळ ३८ धावा करता आल्या.